महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/११ वी ऑनलाईनप्रवेश/पुवि/२०१४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : ५/५/२०१४

5 MAY 2014

प्रति

सर्व मूख्याध्यापक
माध्यमिक शाळा
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय : इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.

पुणे व पिंपरी महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात केंद्रशाळांमार्फत व संपर्क शाळांमार्फत आपण मागणी नोंदविल्याप्रमाणे आपल्या शाळांमार्फत इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका विदयार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येत आपल्या संपर्क शाळांमार्फत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिल्लक राहीलेल्या २ पेक्षा अधिक इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका परत मुख्य केंद्र प्रमूखांकडे जमा करावयाच्या आहे. **दिनांक ९/५/२०१४ अखेर अशा सर्व पुस्तिका मुख्य केंद्रप्रमूखांकडे जमा करावयाच्या आहेत.** अन्यथा शिल्लक असलेल्या माहिती पुस्तिका ची किंमत भरणा करावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत मुख्य केंद्रप्रमूख शाळेव्यतिरिक्त एकाही माध्यमिक शाळांमध्ये इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका जादा शिल्लक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व केंद्र प्रमूखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, वरील प्रमाणे आपल्या सर्व संपर्क शाळांप्रमूखांना त्याप्रमाणे सूचना देवून इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका आपल्याकडे जमा करुन संबंधित शाळांना पोहोच देण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. श्रीमती तिलोत्तमा रेड्डी
मूख्याध्यापिका, अहिल्यादेवी हायस्कूल, शनिवार पेठ, पुणे
२. श्रीमती अनिता साळुंखे,
मुख्याध्यापिका, आंबेडकर विद्यालय, कॅम्प पुणे
३. श्री मिश्रा आर. आर.
मुख्याध्यापक, गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड, पुणे

Generated by CamScanner